दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक ४७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.१८ मे २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा होणार

# रायगडावर चढण्यासाठी, उतरण्यासाठी स्वतंत्र मार्ग; विविध पातळ्यांवर नियोजन सुरू



**कोल्हापूर : वृत्तसंस्था**

कोरोनाच्या दोन वर्षांनंतर शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा होणार आहे. प्रतिवर्षापेक्षाही यावेळी शिवभक्त प्रचंड संख्येने येणार असल्यामुळे रायगडावर चढण्यासाठी आणि उतरण्यासाठी महादरवाजापासून स्वतंत्र मार्ग आखण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

भारतीय शिवराज्याभिषेक समितीची राज्यव्यापी नियोजन बैठक सोमवारी पुणे येथे पार पडली. यावेळी राज्यभरातून शिवप्रेमी व जिल्हाप्रमुख उपस्थित होते. या बैठकीला संभाजीराजे यांच्यासह युवराज्ञी संयोगीताराजे तसेच शहाजीराजे उपस्थित होते. संभाजीराजे म्हणाले, गेली दोन वर्षे कोरोना परिस्थितीमुळे शिवभक्तांना रायगडावर येता आले नाही त्यामुळे यावर्षीचा शिवराज्याभिषेक महोत्सव भव्य प्रमाणात साजरा करण्यात येणार आहे. यावर्षी पाच ते सहा लाख शिवभक्त रायगडावर येतील.

संयोगीताराजे म्हणाल्या, शिवराज्याभिषेक सोहळ्याचे ऐतिहासिक मूल्य पाहता हा सोहळा शिस्तबद्ध आणि पर्यावरणपूरक झाला पाहिजे. समितीच्या नियोजनानुसार गडावर पाच ते सहा लाख शिवभक्तांचे अन्नछत्र उभारण्यात येणार आहे. राजसदर फुलांनी सजवण्यात येणार असून भवानी पेठ, बाजारपेठ, जगदीश्वर मंदिर आणि शिवसमाधीवर विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे.

रोपवेसाठी दिव्यांग आणि वृद्धांना प्राधान्य देण्यात यावे आणि शिवभक्तांनी पायी गडावर यावे असे आवाहन यावेळी करण्यात आले. गडावर मुबलक पिण्याचे पाणी असून आरोग्य नियंत्रण कक्षही उभारण्यात येणार आहेत.

निवासासाठी तात्पुरते तंबू उभारण्यात येणार असून गडस्वच्छतेसाठी एक हजार स्वयंसेवक कार्यरत राहणार आहेत. विराज तावरे यांनी स्वागत केले तर समितीचे अध्यक्ष फत्तेसिंह सावंत यांनी प्रास्ताविक केले. बैठकीस समितीचे अतुल चव्हाण, धनंजय जाधव,विश्वास काशिद (पुणे), आप्पासाहेब कुडेकर, डॉ. गजानन देशमुख, शुभम आहिरे (औरंगाबाद), गंगाधर काळकुटे (बीड), गजानन देशमुख (अमरावती), विष्णू इंगळे, हनुमंत काकडे (उस्मानाबाद), महेश शिंदे (तुळजापूर), पंकज जायले (अकोला), रमेश पाळेकर (लोणावळा), प्रशांत दरेकर (रायगड), हेमंत साळोखे, संजय पवार, अमर पाटील, उदय घोरपडे, विश्वास निंबाळकर (कोल्हापूर) तसेच विविध जिल्ह्या–तील पदाधिकारी उपस्थित होते.

# अलिबाग येथे दोन लहान मुलांची हत्या करुन दोन पर्यटकांची गळफास लावून आत्महत्या



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

दोन लहान मुलांची हत्या करुन, दोन पर्यटकांनी गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना अलिबाग येथे उघडकीस आली आहे. आज (१७ मे) दुपारी चार वाजण्याच्या सुमारास हा प्रकार समोर आल्यानंतर अलिबागमध्ये खळबळ उडाली आहे.

पुण्यातील शिरुर पुणे येथील एक महिला २५ वर्षी महिला आणि २९ वर्षीय पुरुष पाच वर्षाची मुलगी आणि तीन वर्षाच्या मुलाला घेऊन अलिबाग येथे आले होते. मांडवी मोहल्ला येथील ब्लॉसम कॉटेज येथे हे चौघेही ११ तारखेपासून वास्तव्याला होते. आज चौघांचे मृतदेह ते राहत असलेल्या खोलीत आढळून आले. दोन्ही मुलांची हत्या करून या दोघांनी गळफास लाऊन आत्महत्या केली असण्याचा संशय पोलीसांनी व्यक्त केला आहे.

१६ मे रोजी सकाळ पासून त्यांच्या रूमचा दरवाजा उघडत नसल्याने तसेच काहीच हालचाल दिसून येत नसल्याने दुपारी ३ च्या सुमारास कॉटेज मालकाने दरवाजा उघडला असता मुलांचे मृतदेह बेड वर तर दोघांनी गळफास लावलेला दिसून आला. याप्रकरणी अलिबाग पोलिसांना कळवताच पोलिस तातडीने घटनास्थळी पोहचले पंचनामा करून मृतदेह शव विच्छेदन करण्यासाठी रुग्णालयात नेले असून त्यांच्या कुटुंबीयांना कळविण्यात आले आहे. या मृतांमध्ये कुणाल गायकवाड (२९ हिंगवले मळा, ता.शिरुर, पुणे), प्रियांका संदीप इंगळे (२५), भक्ती संदीप इंगळे (५), माऊली संदीप इंगळे (३) सर्व रा.पैठण, औरंगाबाद अशी नावे आहेत. दरम्यान यातील मृत महिला हरविल्याची फिर्याद तिच्या पतीने १ मे रोजी पोलिस ठाण्यात नोंदविली होती.

घटनेची माहिती पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामे करून चारही मृतदेह शवविच्छेदनासाठी रवाना केले आहे. पोलीस अधिक्षक अशोक दुधे यांनीही घटना स्थळाची पहाणी केली आणि या प्रकरणाचा सखोल तपास करण्याचे निर्देश दिलेत. या घटनेनंतर अलिबाग शहरात खळबळ उडाली आहे.

## संक्षिप्त...

### महाराष्ट्रातील सर्वपक्षीय आमदारांना संभाजीराजे छत्रपतींचं खुलं पत्र

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील विधानसभा आमदारांना संभाजीराजे छत्रपती यांनी खुलं पत्र लिहिलं आहे. या पत्रातून राज्यसभेच्या सहाव्या जागेसाठी अपक्ष म्हणून मला संधी देण्यात यावी, असं आवाहन त्यांनी सर्व राजकीय पक्षांना आणि अपक्ष आमदारांना केले आहे. राज्यसभेच्या सहाव्या जागेसाठीच्या घडामोडींनी वेग घेतला आहे. शिव–सेनेने तर राज्यसभेच्या सहाव्या जा–गेवर आपण उमेदवार देणार असल्याचं जाहीर करुन संभाजीराजेंसमोरील अडचणी वाढवल्या आहेत. त्यातच संभाजीराजेंनी राज्यातील सर्व आमदारांना खुलं पत्र लिहून सर्वपक्षीय आमदारांनी आपल्याला पाठिंबा द्यावा म्हणून प्रयत्न सुरू केले आ–हेत. आपणांस कल्पना आहेच की, महाराष्ट्रातून राज्यसभेच्या सहा जागा रिक्त होत आहेत. या जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेला आहे. या निवडणुकीत मी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करीत आहे. या निवडणुकीत विजयी होण्यासाठी कोणत्याही उमेदवारास विधानसभा सदस्यांच्या ४२ मतांची आवश्यकता आहे.

महाराष्ट्र विधानसभेतील पक्षीय संख्याबळाचा विचार करता, या सहा जागांपैकी शिवसेना, राष्ट्रवादी व काँग्रेस या पक्षांना प्रत्येकी एक व भाजपला दोन जागांवरती विजय मिळविणे शक्य वाटते. उर्वरित एक जागेकरिता कोणत्याही एका पक्षाकडे पुरेसे संख्याबळ नाही. करिता, या जागेवरती अपक्ष म्हणून मला संधी देण्यात यावी, असे आवाहन मी सर्व राजकीय पक्षांना व अपक्ष आमदारांना केलेले आहे.

२००७ पासून सामाजिक चळवळींच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात मी कार्यरत आहे. छत्रपती शिवाजी महाराज व राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी दिलेली शिकवण आचरण करीत मी राजकारण विरहित कार्य करीत आलो आहे. राष्ट्रपतीनियुक्त खासदार असताना देखील कोणत्याही बाबतीत भूमिका घेताना वैयक्तिक राजकीय भवितव्याचा विचार न करता, सदैव समाजाला दिशा देण्याचीच भूमिका घेतली. संसदेत काम करीत असताना महाराष्ट्राच्या व देशाच्या हितासाठी कोणताही पक्षीय अभिनिवेश न बाळगता पक्षविरहित काम केले.

# चेन खेचुन पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका लुटारुला नागरिकांनी पकडले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रस्त्याने पायी चालत जाणाऱ्या व्यक्तीच्या गळ्यातील तब्बल १ लाख २० हजार रुपये किंमतीची सोन्याची चैन खेचुन मोटारसायकलवरुन पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका लुटारुला नागरिकांनी पकडुन पोलिसांच्या स्वाधीन केल्याची घटना सोमवारी रात्री कामोठे सेक्टर–६ मध्ये घडली. राजु केवल दाबस (३८) असे या लुटारुचे नाव असून कामोठे पोलिसांनी त्याला जबरी चोरीच्या गुह्याखाली अटक करुन पल्सरवरुन पळून गेलेल्या त्याच्या साथिदाराचा शोध सुरु केला आहे.

या घटनेतील तक्रारदार रविंद्र तानाजी गिड्डे (३८) हे कामोठे सेक्टर–६ मध्ये राहण्यास असून ते पनवेल, कामोठे, कळंबोली परिसरात आपली रुग्णवाहिका चालवतात. सोमवारी रात्री सव्वा नऊ वाजण्याच्या सुमारास गिड्डे आपल्या कामावरुन परतल्यानंतर ते फोनवर बोलत सेक्टर–६ मधील तृतीया अपार्टमेंटच्या दिशेने जात होते.

यावेळी त्यांच्या पाठीमागून काळ्या रंगाच्या पल्सर मोटारसायकलवरुन आलेल्या दोघा लुटारुंपैकी पाठीमागे बसलेल्या लुटारुने गिड्डे यांच्या गळ्यातील १ लाख २० हजार रुपये किंमतीची ३० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन खेचली. त्यानंतर दोघे लुटारु पळून जाण्याच्या प्रयत्नात असतानाच गिड्डे यांनी प्रसंगावधान दाखवत त्यांची चैन खेचणाऱ्या लुटारुचे टी–शर्टची कॉलर पकडले.

त्यामुळे सदर लुटारु मोटारसायकलवरुन खाली पडल्यानंतर गिड्डे यांनी त्याला पकडून ठेवले, मात्र सदर लुटारु गिड्डे यांच्या तावडीतून सुटका करुन घेत पळून जाण्याचा प्रयत्न करत असल्याने गिड्डे यांनी आरडा–ओरड केली. त्यामुळे त्या भागातील नागरिकांनी सदर ठिकाणी धाव घेऊन लुटारु राजु केवल दाबस (३८) याला पकडुन त्याची झडती घेतली.

यावेळी त्याच्या खिशामध्ये गिड्डे यांच्या गळ्यातून खेचलेली सोन्याची चैन सापडली. त्यानंतर नागरिकांनी या लुटारुला कामोठे पोलिसांच्या स्वाधीन केले. कामोठे पोलिसांनी आरोपी राजु दाबस याला जबरी चोरीच्या गुह्याखाली अटक करुन पल्सर मोटारसायकलवरुन पळून गेलेल्या त्याच्या साथिदाराचा शोध सुरु केला आहे. या घटनेत सदर लुटारु मोटारसायकलवरुन खाली पडल्याने तो जखमी झाला आहे.

# विषारी आणि हिंसक वातावरण निर्माण करणाऱ्या शक्तींविरोधात भूमिका घेण्याची वेळ : माधव भंडारी

**दै.रायगड नगरी । पनवेल**



राष्ट्रवादीच्या उन्मादी कार्यकर्त्यांनी पोलिसांना वेठीस धरून सुरू केलेल्या गुंडगिरीमुळे शांततेने जगण्याचा जनतेचा हक्क संकटात आला आहे, असा आरोप भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष आणि मुख्य प्रवक्ते माधव भंडारी यांनी करून विषारी आणि हिंसक वातावरण निर्माण करणाऱ्या शक्तींविरोधात भूमिका घेण्याची वेळ जनतेवर आली आहे, असे सूतोवाच आज(मंगळवार, दि. १७ मे) पनवेल येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत केले. पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यलयात झालेल्या या पत्रकार परिषदेस भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भरत जुमलेदार उपस्थित होते.

महाराष्ट्रात सध्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून गुंडगिरीची भाषा केली जात आहे. राष्ट्रवादी विद्यार्थी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडून शोधा आणि फोडा असे आवाहन कार्यकर्त्यांना केले गेले. आणि हे उघड्या डोळ्याने दिसतानाही महाविकास आघाडीचे शरद पवार यांच्या मूक संमतीनेच महाविकास आघाडी सरकार पुरस्कृत दहशतवाद माजला आहे कि काय असा सवालही माधव भंडारी यांनी उपस्थित केला. अंतर्गत सत्तासंघर्षातून आलेल्या वैफल्यातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी कायदा हातात घेऊन चालविलेला धुडगूस आणि दहशतवाद तातडीने थांबवून कायद्याला त्याचे काम करू द्यावे, असा सल्लाही माधव भंडारी यांनी यावेळी दिला. गुंडगिरी आणि दहशतवाद माजविणाऱ्या कार्यकर्त्यांना संरक्षण देण्याच्या सूचना राज्याच्या गृहखात्याकडूनच पोलिसांना मिळाल्यामुळे पोलिसांचे हात बांधले गेले आहेत, असा आरोप करून, संयमी राजकारण करणारे शरद पवार यांचे मौन त्यांच्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देत असल्याची शंकाही त्यांनी व्यक्त केली.

माधव भंडारी यांनी पत्रकारांशी संवाद साधताना पुढे म्हंटले कि, आघाडी सरकार सत्तेवर आल्यापासून सत्ताधाऱ्यांच्या प्रोत्साहनातून ठिकठिकाणी कायदा हातात घेऊन दहशत माजविण्याचे प्रकार सुरू आहेत. सरकारकडूनच अशा प्रकरणांतील गुन्हेगारांना संरक्षणही मिळत असल्यामुळे सामान्य जनतेचा शांततेने जगण्याचा हक्कच संपुष्टात .../२

# मुंबई-गोवा महामार्गाला दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकरांचेच नाव द्या

## पेण पत्रकारांचे तहसीलदारांना निवेदन

**दै.रायगड नगरी । पेण**



मुंबई गोवा महामार्गाला आद्य पत्रकार, दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे नाव द्यावे या मागणीसाठी कोकणातील सर्व तालुक्यातील पत्रकारांनी निवेदन दिले. आज पेण तालुक्यातील पत्रकारांनी पेण तह–सीलदार व प्रांत अधिकारी यांना याबाबत निवेदन दिले.

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली रायगडसह कोकणातील पत्रकारांनी सातत्यानं दहा वर्षे रस्त्यावर उतरून लढा दिला. महाराष्ट्रा पासून दिल्लीपर्यंत पाठपुरावा केल्यानंतर महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम सुरू झाले. काम रखडल्यानंतर देखील वेळोवेळी पत्रकारांनी पाठपुरावा केला होता. पत्रकार लढत होते तेव्हा सर्व राजकीय पक्ष मूग गिळून गप्प होते. मात्र आता रस्त्याचे काम पूर्णत्वास येत असताना अनेक नेते श्रेय लाटण्यासाठी समोर येत आहेत. तसेच काहींनी महामार्गासाठी वेगवेगळी नावं सूचवून मोडता घालण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर हे कोकणचे सुपूत्र आहेत. पत्रकारांमुळे हा महामार्ग होत असल्याने बाळशास्त्रींचे महामार्गाला नाव देणे औचित्यपूर्ण ठरणार असल्याने सरकारने तातडीने तसा निर्णय घ्यावा अशी मागणी कोकणातील सर्व पत्रकार करीत आहेत. विविध प्रकल्पांना राजकीय नेत्यांची नावं दिली जात असतात. मुंबई – गोवा महामार्गाला एक पत्रकार, विचारवंत, समाजसुधारक असलेल्या बाळशास्त्रींचे नाव देऊन औचित्य साधावे अशी भावना राज्यातील पत्रकारांची आहे.

मुंबई – गोवा महामार्गाला बाळशास्त्री जांभेकर यांचे नाव द्यावे या मागणीसाठी कोकणातल्या रायगड, .../२

# पाणी योजनेला आडवे येण्याचे पाप कुठे फेडणार : रवि मुंढे

## पाणी योजना सुरू करण्यासाठी उपोषणास बसणार?

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा शहराचा बिकट झालेला पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी महाराष्ट्र भाजपा सरचिटणीस रवीभाऊ मुंढे यांनी त्यांच्या सौभाग्यवती सौ.रेश्मा मुंढे नगराध्यक्ष असताना जनतेला दिलेला शब्द पूर्ण करून माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मदतीने पाणी योजना मंजूर करून घेतली. त्याचबरोबर वाढीव पाणी देखील मंजूर करून घेतले. मात्र या अत्यंत महत्त्वाच्या पाणी योजनेला सत्ताधारी अप्रत्यक्षपणे आडकाठी आणण्याचे पाप करीत असल्याचे पत्रकार परिषदेत स्पष्ट करून पाणी योजनेला आडवे येण्याचे पाप कुठे फेडणार? असा प्रश्न महाराष्ट्र भाजपा सरचिटणीस राविभाऊ मुंढे यांनी उपस्थित केला आहे.



माजी नगराध्यक्ष यांच्या प्रयत्नांना मिळालेल्या यशातून तळा पाणी पुरवठा योजनेस प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. नव्याने मंजूर झालेल्या योजनेत वावे धरणातून शहरासाठी घरपट ३५ लिटर पाणी देण्याचे आरक्षित करण्यात आले होते, परंतु ३५ लिटर पाणी आजच्या युगात न पुरणारे आहे हे पाणी १३५ लिटर मिळावे यासाठी पालकमंत्री अदिती तटकरे यांनी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांच्याकडे पाठपुरावा केला मी स्वतः त्यावेळी त्यांच्या समवेत होतो,जलसंपदा खात्याकडून त्या प्रकारचे पत्र देखील देण्यात आले.संपूर्ण पाणी योजना मंजूर झालेली असताना मात्र सत्ताधारीच पडद्या मागून शहरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यापासून .../२

# प्रभाकर पांडुरंग मोकल यांना 2022 चा राज्यस्तरीय सेवासन्मान पुरस्कार प्राप्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पेण तालुक्यातील कोपर गावचे व सध्या सु.ए.सो.पालीचे आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके, माध्यमिक विद्यालय शिरढोण, येथे कार्यरत असलेले सहा. शिक्षक प्रभाकर पांडुरंग मोकल यांना २०२२ चा राज्यस्तरीय सेवासन्मान पुरस्कार प्राप्त झाला आहे.

महाराष्ट्र शिक्षक पॅनल (चड्झ) तर्फे राज्यातील गुणवंत शिक्षकांना दिला जाण-ारा २०२२ चा राज्यस्तरीय सेवासन्मान पुरस्कार रविवार १५ मे रोजी श्री अंकुशराव लांडगे नाट्यगृह भोसरी पुणे येथे शिक्षक आमदार मा. विक्रम काळे साहेब, सुधीर तांबे, सिनेअभिनेत्री निशिगंधा वाड तसेच इतर मान्यवर पदाधिकारी यांच्या शुभहस्ते संपन्न झाला आहे.

त्या प्रसंगी प्रभाकर मोकल यांनाही सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल, पुष्पगुच्छ व मानाची पगडी देऊन सन्मानित करण्यात आले. प्रभाकर पांडुरंग मोकल यांनी. आपल्या अखंडित २९ वर्षीय शैक्षणिक सेवेत ज्ञानदानाबरोबरच अध्यापन क्षेत्रात प्रयोगशीलता, उपक्रमशीलता व विद्यार्थ्यांच्या इच्छित ध्येयपूर्तीसाठी केलेली धडपड, गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी मोफत शालेय गणवेश तसेच लागणाऱ्या शैक्षणिक साहित्याची मदत म्हणून देणे. अशा या शैक्षणिक कार्याबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्य, क्रीडा व पर्यावरण अशा विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र शिक्षक पॅनल (चड्झ) टीमच्यावतीने २०२२ चा राज्यस्तरीय सेवासन्मान पुरस्कार देऊन प्रभाकर मोकल यांना गौरविण्यात आले आहे.

# नडवली येथे महामानवांची संयुक्त जयंती उत्साहात संपन्न



**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

शांतीदूत भगवान गौतम बुद्ध यांचा २५६६ वा,छत्रपती शिवराय यांचा ३९२ वा,क्रांतीसूर्य महात्मा फुले यांचा १८७ वा,महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३१ वा संयुक्त जयंती महोत्सव ता.१६ मे रोजी रोहे तालुक्यातील नडवली या गावी बहुजन हिताय संघ रजि. (मुंबई) व संयुक्त जयंती कमिटी यांच्या वतीने मोठ्या उत्साहात विविध प्रकारच्या कार्यक्रमांनी संपन्न करण्यात आला.

यावेळी १५ मे रोजी सक्षम एज्युकेशन सोसायटी आयोजित मोफत आरोग्य तप-ासणी शिबिर तज्ञ डॉ.केतकी तरे व डॉ. धुळेश गोराड यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न करण्यात आले. तसेच या संयुक्त जयंती यहोत्सवातंर्गत सकाळी धम्म ध्वजारोहण व बुद्धवंदना,प्रमुख पाहुण्यांचे हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा व जेष्ठ नागरिकांचे हस्ते वृक्षारोपण,तद्नंतर दु.१२ वा मार्गदर्शिका तथा प्रवक्त्या डॉ. स्वाती पवार यांचे व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम व भोजनदान,सायं.५ वा.सांस्कृतिक कार्यक्रम व अभिवादन सभा,तर रात्रौ.८ वा.मनोरंजनाचे कार्यक्रम आदी कार्यक्रम यावेळी संपन्न करण्यात आले.

याच कार्यक्रमातंर्गत आ.अनिकेत तटकरे यांनी सदिच्छा भेट देऊन त्यांच्याच हस्ते आर. ओ.प्लँटंचे बांधकामाचे भूमीपूजन करण्यात आले.यावेळी जेष्ठ नेते रामचंद्र चितळकर, सरपंच मानसी चितळकर,उपसरपंच मनोज शिर्के, माजी उपसरपंच कांचन मोहिते,अध्यक्ष संदीप वाटवे,स्वागताध्यक्ष सुदिन वाटवे आदी मान्यवरांसह बहुजन हिताय संघ रजि. (मुंबई) व संयुक्त जयंती कमिटीचे पदाधिकारी व सदस्य तसेच स्थानिक ग्रामस्थ, महिला मंडळ व नडवली तरूण मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अनुजा वाटवे हिने केले तर राहूल वाटवे यांनी आभार व्यक्त करून कार्यक्रमाची यशस्वीरीत्या सांगता करण्यात आली.

# खांब येथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील ग्रु.ग्रा.पंचायत खांब व एकता फाऊंडेशन यांच्या वतीने तसेच येथील उपसरपंच मनोज शिर्के व सदस्य दत्तात्रेय वातेरे यांच्या प्रयत्नातून ग्रा.पं.कार्यालय येथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा यशस्वीरीत्या संपन्न करण्यात आली.

तिमिरातून तेजाकडे हे ब्रिदवाक्य घेऊन सामाजिक बांधिलकी जपून व तळागाळातील विद्यार्थी विकासाच्या दृष्टीने कार्य करणारे मुख्य समुपदेशक तथा मार्गदर्शक अनुवाद अधिकारी मुंबई सीमाशुल्क विभाग वित्त मंत्रालय श्री. सत्यवान रेडकर यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यशाळेप्रसंगी येथील जेष्ठ नेते रामचंद्र चितळकर, प्रकाश थिटे,सरपंच मानसी चितळकर,माजी सरपंच रंजना टवळे,सदस्य दत्तात्रेय वातेरे,पो.पाटील मनोज सावरकर,एकता ग्रुपचे किशोर महाबळे, मंगेश महाबळे,प्रविण पिंपळकर,किशोर जाधव,चंद्रकांत अधिकारी आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

या कार्यशाळेत मार्गदर्शक सत्यवान रेडकर यांनी उपस्थित विद्यार्थी व पालक वर्गाला उत्तम करिअरसाठी स्पर्धा परीक्षा, अभ्यासक्रम,त्यासाठी लागणारी मेहनत व पालकांची आपल्या पाल्याप्रती असणारी भूमिका याबाबत मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सदस्य दत्तात्रेय वातेरे यांनी केले. तर पो.पाटील मनोज सावरकर यांनी आभार व्यक्त करून या कार्यशाळेची सांगता करण्यात आली.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल **मे.कॉलिटी इन्फ्रा तर्फे प्रो.प्रा.श्री.नौमान नूर अहमद पटेल** पत्ता : शॉप नं.५, फ्रोरा बिडींग, प्लॉट नं.१३४, सेक्टर-१०, तळोजा फेज-१, ता.पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०८ यांनी मुळ मालक **१) श्री.श्रीपत माहादू पाटील, २) श्रीमती.गुनाबाई माहादू पाटील, ३) धर्मा सुदाम पाटील, ४) श्रीमती. पदीबाई बबल्या पाटील, ५) श्री.हरी बबल्या पाटील** सर्व रा.मुर्बी, ता.पनवेल, जि.रायगड **६) श्रीमती.सावित्रीबाई भुराजी राजे** रा.तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड **७) श्रीमती.रंजीता राम पाटील** रा.मुर्बी, ता.पनवेल, जि.रायगड **८) करिश्मा राम पाटील उर्फ सौ.करिश्मा योगेश म्हात्रे** रा.कामोठे, ता.पनवेल **९) श्री.अतुल राम पाटील,** रा.मुर्बी, खारघर, **१०) स्वेता राम पाटील उर्फ सौ.स्वेता विकास भोपी** रा.रिटघर, मोर्बे, **११) श्रीमती.साजेश राम पाटील** रा.मुर्बी, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड, त्यांच्या मालकीची मिळकत सिडकोने १२.५ टक्के योजनेंतर्गत संपादीत करण्यात आलेली असून सदरहू संपादनापोटी खालील भूखंड मिळालेला असून सदरहू भूखंड आमचे अशिल हे सिडको त्रिपक्षीय करारान्वये हस्तांतरीत करून घेणार आहेत. सदरहू भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**सिडको फाईल नं.१००४/तळोजा फेस-२**

| नोड | सेक्टर नं. | प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| तळोजा | १८ | १० | १७४४.९६ चौ.मी. |

तरी वरील वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी यांची कोणाचाही दान, गहाण, तारण, लिन, चार्ज, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत आम्हाला आमचे खालील पत्यावर समक्ष येवून भेटून त्याबाबत मुळ कागदपत्रानिशी वरील नमूद केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवून तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसात जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून विकसनाचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,

**सही/-**
**ॲड.रेखा किशोर होवाळे**
**शॉप नं.१३, प्रभात सेंटर, सेक्टर-१,**
**सीबीडी बेलापूर, नवी मुंबई**
**मो.नं.८३६९०१७३६३**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमीन मिळकत आमचे अशिल यांनी विकत घेण्यासाठी मिळकतीचे विद्यमान मालक **श्री.अविनाश बाबुराव हजारे** यांच्याकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरोसा मिळकतीचे मालकांनी आमच्या अशिलांस दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन** : तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका : सुधागड यांचे हद्दीतील मौजे : नेरे, तालुका : सुधागड, जिल्हा : रायगड येथील, शेतीचे स्थानिक नाव : **गावदेवाकडे,** जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | ६९ | ०.१०.१० | ०.३९.०० | श्री.अविनाश बाबुराव हजारे |

**सदर नोटीसीची विषय असलेले खरेदी करावयाचे एकूण क्षेत्र ०.१०.१० आकार ०.३९.०० असे आहे.**

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, ताबा, मालकी, वहिवाट, बयाणा, साठेकरार, लीज, चार्ज, बोजा, पोटगी हक्क, विक्री, तारण, गहाण, जाण्या-येण्याचा व इतर हक्क असल्यास त्यांनी, हक्काचे पृष्ठ्यार्थ असणाऱ्या सर्व कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कराव्यात. वरील मुदतीत अशा प्रकारच्या कोणत्याही हरकती न आल्यास, वरील मिळकतीमध्ये कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध नाही अथवा असल्यास तो आमच्या अशिलाचे लाभात सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीबाबत खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कोणाचीही येणारी हरकत, तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

स्थळ : सुधागड
तारीख : १७/०५/२०२२

**सही/-**
**ॲड.किरण डी. सावंत**
**कार्यालय पत्ता : ४१, पहिला मजला,**
**हिरानंदानी क्रिस्टल प्लाझा, ३ स्टार**
**हॉटेल जवळ, प्लॉट नं.१८-२७,**
**सेक्टर-७, खारघर, नवी मुंबई-४१०२१०**

# फडके विद्यालयात छंदवर्ग संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयामधे उन्हाळी छंदवर्ग संपन्न झाला. या निमित्ताने विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिके संपन्न झाली. फडके विद्यालयाच्या प्रांगणात हा कार्यक्रम संपन्न झाला. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या मातृसंस्थेच्या मार्गदर्शनानुसार शाळेच्या शैक्षणिक वर्गाची सांगता या शिबिराच्या माध्यमातून झाली.

यामध्ये ढोल-ताशा, लाठी-काठी, एरोबिक्स, चित्रकला, हस्तकला, मेहंदी, नेलआर्ट, साडीवरील कलाकुसर , जर्मन भाषा वर्ग इ. विविधांगी कलांचा समावेश होता. सर्व सहभागी विद्यार्थ्यांनी आपापल्या क्षेत्रातील प्राप्त केलेले नैपुण्य प्रात्यक्षिक व प्रदर्शनाच्या माध्यमातून उपस्थितांसमोर सादर केले. याप्रसंगी झालेल्या कार्यक्रमात सर्व विद्यार्थी, प्रशिक्षक, विद्यालयाच्या सर्व माध्यमाच्या मुख्याध्यापिका, शिक्षक, तसेच पालकवृंद यांनी आवर्जून उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातील महत्त्वाचा टप्पा म्हणजे कला...! मुलांमध्ये अभ्यासाबरोबरच काही चांगले गुण असतात. ते प्रगट करण्याची संधी वेगवेगळ्या उपक्रमातून त्यांना मिळवून देणे हा या शिबिरामागील हेतू आहे '' अशी प्रतिक्रिया मुख्याध्यापिका मानसी वैशंपायन यानी दिली.

# ज्येष्ठ नागरिक मंडळ मुळेखंडचे आरोग्य शिबीर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ज्येष्ठ नागरिक मंडळ,मुळेखंड, तेलीपाडा, कोळीवाडा, कुंभारवाडा परिसर यांनी मंगळवारी मधुमेह व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन मुळेखंड फाटा येथील खोपनदेव येथे करण्यात आले होते. या शिबिराला ज्येष्ठ नागरिकांनी प्रतिसाद देत तपासणी करून घेतली हे शिबीर लायन्स क्लब उरण यांच्या संयुक्त विद्यमाने भरविण्यात आले होते.



शिबिराचे उद्घाटन उरण पंचायत समितीचे माजी सभापती सागर कडू यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी लायन्स क्लबचे सदानंद गायकवाड, ॲड. दत्तात्रेय नवाले, नरेंद्र ठाकूर तर सामाजिक कार्यकर्ते जयवंत ल. पाटील यांच्या सह मंडळाचे अध्यक्ष प्रकाश म्हात्रे, अनंत पाटील, जगदीश पाटील, परशुराम पाटील, ईशवर म्हात्रे, गोपीनाथ मांडलकर, अशोक म्हात्रे, केशव म्हात्रे आदी जण उपस्थित होते. यावेळी नेत्र रोग तज्ञ डॉ. शुभदा कुडतरकर व मधुमेह तज्ञ डॉ.जयराज मिश्रा यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी रुग्णाची तपासणी केली.

# स्किल ऑनलाईन गेम जुगावर तालुका पोलिसांची कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्किल ऑनलाईन गेम हा जुगावर खेळणाऱ्या आठ जणांविरुद्ध पनवेल तालुका पोलिसांनी कारवाई करून त्यांच्याकडून रोख रक्कम, स्कॅनर, स्क्रिन संगणक, सीपीयु, किबोर्ड असा मिळून जवळपास ३१ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

जुने पनवेल-पुणे हायवे रोडवरील कोन गाव परिसरात एका गाळ्यामध्ये बेकायदेशीररित्या संगणकाद्वारे ऑनलाईन जुगार चालविला जात असल्याची माहिती वपोनि रवींद्र दौंडकर यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि गिरीधर गोरे, गुन्हे शाखा कक्ष २ पनवेल सपोनि विवेक भोईर, सपोनि प्रवीण फडतरे, पोलीस उपनिरीक्षक आकाश पवार व पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून आठ जणांना ताब्यात घेवून त्यांच्याकडून ३१ हजार १०० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

## महाराष्ट्र शासन
## महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)

Email : mahad.ee@mahapwd.gov.in Ph.No. (02145) 222167

**ऑनलाईन निविदा सूचना क्रमांक ११ सन २०२२-२०२३ (द्वितीय सुचना / फेरनिविदा)**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा : रायगड, पिन ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालील प्रमाणे बी-१ नमुनयातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा : रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अनु क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | भाग अ (स्थापत्य कामाची किंमत) | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | म्हाप्रळ आंबेत पुरार रस्त्यावरील (रामा.१०१) सावित्री खाडीवरील कि.मी. ०/८०० मधील आंबेत पुलाची विशेष दुरुस्ती करणे. (पुलाच्या पायाची दुरुस्ती करणे) तालुका : म्हसळा, जिल्हा : रायगड | ८९८५८९४१ | ८६९५१०८१ | ४५०००० | ३३६० | ०६ महिने |

ई निविदेचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक १८/०५/२०२२ (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक ३१/०५/२०२२ वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | निविदा पुर्व बैठक | मा.मुख्य अभियंता, (सा.बां.) प्रादेशिक विभाग, कोकण, फोर्ट मुंबई यांचे कार्यालयात दिनांक २४/०५/२०२२ वेळ १५.०० वाजता |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधिक्षक अभियंता, रायगड सा.बां.मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक ०३/०६/२०२२ वेळ १२.०० वाजता |

टिप : परिपूर्ण निविदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदेचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, अटी व शर्ती या वरील संकेत स्थळांवरच पाहता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/२०९५
दिनांक : १२/०५/२०२२

**सही/-**
**(एम.आर.नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## विषारी आणि हिंसक वातावरण निर्माण करणाऱ्या शक्तींविरोधात भूमिका घेण्याची वेळ : माधव भंडारी

आला आहे. पोलीस यंत्रणेस वेठीला धरून सत्ताधारी पुरस्कृत दहशतवादामुळे राज्यात अशांतता माजली असून विरोधकांना दहशतीच्या मार्गाने संपविण्याचा कुटिल डाव सत्ताधारी पक्षाने आखला आहे. पालघरमधील साधूंचे हत्याकांड, मंत्री आव्हाड यांच्या बंगल्यावर करमुसे नावाच्या अभियंत्यास पोलिसांदेखत झालेली मारहाण, किरीट सोमय्या, सदाभाऊ खोत, गोपीचंद पडळकर यांच्यावरील जीवघेणा हल्ला, भाजपचे प्रवक्ते विनायक आंबेकर यांच्या कार्यालयात घुसून राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी केलेली मारहाण, केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांच्या कार्यक्रमात दहशत माजविण्याचा राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचा प्रयत्न, आणि पोलिसांनी अटक केल्यानंतरही एका अभिनेत्रीस मारहाण करण्याचा प्रयत्न या सर्व घटना राष्ट्रवादीने कायदा हातात घेतल्याचे पुरावे आहेत. राज्याचे गृहखाते राष्ट्रवादी काँग्रेसकडेच असल्यामुळे दंगेखोर कार्यकर्त्यांवर कारवाई न करता दहशतवादास सामोरे जाणाऱ्यांवरच कारवाई केली जात असल्याने, सत्ताधाऱ्यांकडून जाणीवपूर्वक राज्य अस्थिर करण्याचे प्रयत्न होत असल्याची शंका बळावते असे ते म्हणाले. केतकी चितळे प्रकरणानंतर जाहीर पत्रक काढून मारहाण करण्याच्या, तोडण्याचा आदेश दिला जात असताना पोलिसांनी व सरकारने पाळलेले मौन म्हणजे या कटाचाच पुरावा आहे, असेही माधव भंडारी यांनी अधोरेखित केले.

शरद पवार हे महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते आहेत. त्यांच्यावरील वैयक्तिक टीका असमर्थनीय आहे. पण कायदेशीर कारवाई सुरू असतानाही मारहाणीचे आदेश देणे व दहशत पसरविणे यातून राज्याची कायदा सुव्यवस्था संपविण्याचा कट उघड होतो, असेही ते म्हणाले. २५ वर्षे शिवसेनेचाच मुख्यमंत्री असावा या उद्धव ठाकरे यांच्या विधानामुळे वैफल्य आल्याने राष्ट्रवादीचे कार्यकर्ते राज्याला वेठीस धरत असतील, तर पवार यांनी त्यांना आवर घालावा असे आवाहनही त्यांनी केले. खैरनार यांच्यासारख्या अधिकाऱ्याने प्रतिमा उद्धस्त करण्यासाठी मोहीम उघडूनही विचलित न होता शांत राहणाऱ्या पवार यांच्यावर एका अभिनेत्रीने केलेल्या टीकेमुळे राज्याची कायदा सुव्यवस्था वेठीस धरण्याच्या हालचाली याच वैफल्यातून सुरू आहेत. पोलिसांना हाताशी धरून त्याची योजनाबद्ध कार्यवाही सुरू असल्याचा संशयही माधव भंडारी यांनी व्यक्त केला. कायद्याचे संरक्षण प्रत्येक नागरिकाला मिळाले पाहिजे मात्र त्या पलीकडे जात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे विरोधकांवर तुटून पडा असे आदेश हिंसकवादी भूमिका जाहीर करत आहेत, असेही त्यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना अधोरेखित केले.

## मुंबई-गोवा महामार्गाला दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकरांचेच नाव द्या

रत्नागिरी, सिंधुदुर्ग या तीनही जिल्ह्यातील पत्रकारांनी तालुका पातळीवर तहसिलदारांना निवेदनं दिले. अशाच प्रकारचे निवेदन पेण तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे यांना पेण प्रेस क्लबचे अध्यक्ष देवा पेरवी यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. यावेळी कोकण विभागाचे सचिव विजय मोकल, उपाध्यक्ष सुनील पाटील, सदस्य कमलेश ठाकूर, संतोष पाटील, प्रकाश माळी, राजेश कांबळे, स्वप्नील पाटील, विनायक पाटील, प्रशांत पोतदार, किरण बांधणकर, अरविंद गुरव, मीतेश जाधव आदीं पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाणी योजनेला आडवे येण्याचे पाप कुठे फेडणार : रवि मुंढे

वंचित ठेवण्याचे पाप करीत असून येणाऱ्या काही दिवसात पाणी योजना वर्क ऑर्डर न आल्यास मी माझ्या पक्षाच्या वतीने उपोषणास बसणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले, शहरातील नागरिकांचा पाणी प्रश्न मार्गी लागला असताना सत्ताधारीच या पाणी योजनेला अडथळा आणत आहेत. एकीकडे कळवळा दाखवायचा व दुसरीकडे कुटनिती वापरून मंजूर झालेली योजनेचे काम सुरू करण्यास विलंब लावायचा असे दुटप्पी धोरण सत्ताधारी घेत आहेत या धोरणाचा भारतीय जनता पार्टीच्या वतीने निषेध करत असल्याचे मुंढे यांनी सांगितले,सत्ताधारी तोंडावर एक आणि मागे एक अशी दुटप्पी भूमिका घेऊन शहरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित ठेवत आहेत. हे त्यांचे अघोरी पाप आहे. हे पाप कुठं फेडणार, असा सवाल मुंढे यांनी उपस्थित केला आहे.

सत्ताधाऱ्यांच्य दुटप्पी भूमिकेचा बुरखा गळून पडला असून शहरातील नागरिकांना पाण्यापासून कोण वंचित ठेवत आहे हे नागरिकांना कळण्यासाठी पाणी योजनेसाठी उपोषणास बसणार असल्याचे भाजपा महाराष्ट्र सचिव रवी मुंढे यांनी जाहीर केले.या पत्रकार परिषदेमध्ये त्यांनी शहरातील अनेक समस्यांवर भाष्य केले. नगरपंचायतीमध्ये नगराध्यक्ष नागरिकांसाठी वेळ देत नाहीत.असा थेट आरोप त्यांनी यावेळी केला. सर्वसामान्य जनतेसाठी ठराविक वेळेत त्यांनी नगरपंचायतीत उपस्थित राहून सहकार्य करणे अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले.त्यांचे पती यांनी प्रशासकीय कामात लुडबुड करू नये असेही त्यांनी यावेळी सांगितले.

सत्ताधारी यांना प्रशासकीय अनुभव कमी असल्याचे उदाहरण त्यांनी यावेळी दिले, एमएसआरडीसी कडून शहरात पथदिवे बसविण्यात आले व चांगल्या प्रकारची सुविधा माजी नगराध्यक्ष सौ.रेश्मा मुंढे यांच्या प्रयत्नांनी तळा शहराला मिळाली सुविधा उपलब्ध करून दिल्या नंतर ती नगरपंच्यतिकडे वर्ग करण्यात येते या पथादिव्यांची डागडुजी तिचे येणारे विद्युत बिल भरण्याची जबाबदारी ही नगरपंच्यतीची असताना त्याचे बिल एमएसआरडीसीने भरावे असा नवा शोध सत्ताधारी यांनी लावला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.त्यामुळे पालकमंत्री जरी चांगल्या प्रकारचे काम करत असल्या तरी स्थानिक सत्ताधारी यांना प्रशासकीय ज्ञान नसल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.या पत्रकार परिषदेसाठी भाजपा तालुका अध्यक्ष ड.निलेश रातवडकर,माजी नगराध्यक्षा सौ.रेश्मा मुंढे, नगरसेवक आणि भाजपा युवा मोर्चा रायगड जिल्हा सचिटणीस रितेश मुंढे उपस्थित होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## सांगीतिक श्रद्धांजलीने अत्रे कट्ट्याचा वर्धापन दिन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल येथील आचार्य अत्रे कट्ट्याने आपला वर्धापन दिन दिग्गज गायकांना सांगीतिक श्रद्धांजली वाहून अनोख्या प्रकारे साजरा केला. सदर कार्यक्रम कर्नाटक संघ हॉल, सेक्टर २ नवीन पनवेल येथे झाला.

कै. रामदास कामत, कै. कीर्ती शिलेदार, कै. राजन मिश्रा व भारतरत्न कै. लतादीदी यांचे गायन मनाला मोहवणारं होतं. या दिग्गज कलावंतांच्या जाण्याने पोकळी तयार झाली असली तरी ख–या अर्थाने रसिकांच्या मनात हे दिग्गज कलाकार कायमचे ठाण मांडून आहेत याची जाणीव सदर कार्यक्रमाने करून दिली. आकाशवाणीच्या कल्याणमधील कलाकारांनी हा सांगीतिक श्रद्धांजलीचा कार्यक्रम सादर केला. मंगेश लटके, प्रतिक फणसे, ज्योती खरे यादवार यांनी गीते सादर केली. त्यांना तबल्यावर स्नेहल धामापूरकर, व्हायोलीन वर रवी सिधये तर संवादिनी वर जयंत फडके यांनी साथ दिली. पूर्वा कर्वे यांनी सूत्रसंचालन केले. या कलाकारांनी सादर केलेल्या संगीत रस सुरस, तिन्हीसांजा सखे निघाल्या, देवा घरचे ज्ञात कुणाला, श्रावणात घननीळा, शतजन्म शोधिताना, यती मन मम, प्रथम तुज पाहता, पावना वामना, कशासाठी येऊ देवा, हसले मनी चांदणे, गुंतता हृदय हे , धन्य भाग सेवाका अवसर पाया अशा एकाहून एक सरस गाण्यांनी रसिक भारावून गेले.

लेखकाने लिहिलेल्या गाण्यांचा मतितार्थ काय आहे, माझा स्वर कसा लागतोय, माझे साथीदार माझ्या बरोबर येत आहेत की नाही या गोष्टींचा विचार करून गाणं सादर केल्यास गायकाचे सादरीकरण प्रभावी होते हे मत मंगेश लटके यांनी व्यक्त केलं. वैशाली केतकर यांनी वर्धापन दिन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## पालीतील अनुज सरनाईकची सुवर्ण कामगिरी

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

गुरुनानक देव युनिव्हर्सिटी अमृतसर येथे झालेल्या इंटर कॉलेज पिंच्याक सिलॅट स्पर्धेत पालीतील अनुज सरनाईकने सुवर्णपदक पटकावले आहे.

या स्पर्धेमध्ये अनुज याने एलकेसी कॉलेज जालंधरचे प्रतिनिधित्व केले होते. येत्या २४ व २६ मे रोजी युनिव्हर्सिटी ऑफ जम्मू येथे होणाऱ्या ऑल युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी गुरू नानक देव युनिव्हर्सिटी च्या संघात अनुज याची निवड झाली आहे. अनुजच्या या यशाबद्दल सर्वस्थरातून त्याचे कौतुक होत आहे. इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनचे अध्यक्ष किशोर येवले यांचे अनुजला मार्गदर्शन लाभले आहे.

# पोलादपूर उपअधिक्षक भुमिअभिलेख कार्यालयामार्फत ड्रोनद्वारे गावठाण भुमापन कायम करण्याचे काम सुरू

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील उपअधिक्षक भुमिअभिलेख कार्यालय, पोलादपूरमार्फत १६ मे २०२२ पासून ड्रोनद्वारे गावठाण जमिनींचे सर्वेक्षण करण्याचा कार्यक्रम सुरू झाला असून पोलादपूर शहरात १९८६ साली भुमिअभिलेख कार्यालय सुरू झाल्यापासून सातबारा जमिनींवरील मालकांऐवजी प्रॉपर्टी कार्डावर भलत्याच मालकांची नोंद करण्यात आल्याच्या घटनांमुळे अनेकांना वर्षानुवर्षे कोर्टकचेऱ्यांचे खेपा माराव्या लागल्या आहेत.

पोलादपूर उपअधिक्षक भुमिअभिलेख कार्यालयामार्फत आता सुरू असलेल्या ड्रोनद्वारे गावठाण भुमापन कायम करण्याबाबतच्या सर्वेक्षणादरम्यान ग्रामस्थांनी गावठाण हद्दकायम, चुना मागि आदी कामांसाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे चौकशी व खात्री केल्याखेरिज अनुकूलता दर्शविल्यास केलेल्या कामात हरकत का घेतली नाही, याकारणास्तव अनेक वर्षांनंतर वारसांना सदरच्या जमिनींबाबत हरकती आणि विलंबमाफीच्या अर्जावरील युक्तीवादांना सामोरे जाऊन स्वत:च्या पिढीजात सातबारा उताऱ्यावरील जमिनींच्या प्रॉपर्टीकार्डांना दुसऱ्यांची नावे लावलेल्या प्रकरणात मनस्ताप होणाऱ्या कोर्टकचेऱ्यांना सामोरे जावे लागत आहे.

पोलादपूर शहरामध्ये अशाचप्रकारे सुमारे १०० हून अधिक नवीन मालक तयार होऊन खऱ्या मालकांना केवळ सातबारा उताऱ्यावरील नावांच्या आधारे प्रॉपर्टीकार्ड मिळविण्यासाठी झगडावे लागत आहे.

१६ मे रोजी लोहारे, पार्ले, हावरे, दिविल, तुर्भे बुद्रूक, १७ मे रोजी माटवण, कणगुले, सवाद, वावे, धारवली, १८ मे रोजी कालवली, आंग्रेकोंड, तुर्भेकोंड, तुर्भेखुर्द, वझरवाडी, १९ मे रोजी चरई, काटेतळी, सडवली, चोळई, धामणदेवी सुतारवाडी, धामणदेवी, २० मे रोजी भोगाव खुर्द, भोगाव बुद्रुक, कातळी, कोंढवी, फणसकोंड, २१ मे रोजी खडकवणे, गोलदरा, महालगूर, पळचिल आणि ओंबळी, दि. २३ मे रोजी रानबाजिरे, मोरगिरी फौजदारवाडी, मोरगिरी, खडपी, गांजवणे, २४ मे रोजी देवपूर, देवपूरवाडी, गोळेगणी, पांगळोली, पैठण, दि.२५ मे रोजी तुटवली, परसुले, क्षेत्रपाळ, कोतवाल बुद्रुक, कोतवाल खुर्द, कोतवाल खुर्द, कुडपण खुर्द, कुडपण बुद्रुक, दि. २५ मे रोजी कापडे बुद्रुक, महाळुंगे, चांभारगणी खुर्द, चांभारगणी बुद्रुक, निवे, दि. २७ मे रोजी ताम्हाणे, किनेश्वर, कापडे खुर्द, रानकडसरी, केवनाळे, दि.३० मे रोजी वाकण, नाणेघोळ, रानवडी बुद्रुक, घागरकोंड, बोरावळे, दि. ३१ मे रोजी देवळे, हळदुळे, दाभिळ, लहुळसे, लहुळसे, करंजे, दि.१ जून रोजी बोरज, उमरठ, साखर, साळवीकोंड, गोवेले, दि. २ जूनरोजी खांडज, चांदके, खोपड, खोपड, ढवळे, चांदले, दि. ३ जूनरोजी चिखली, आडावळे बुद्रुक, आडावळे खुर्द, मोरसडे, नाव–ाळे, दि. ४ जून रोजी सडे, बोरघर, वडघरबुद्रुक, कामथे असा ड्रोनद्वारे गावठाण जमिनींचे सर्वेक्षण करण्याचा कार्यक्रम अधिकृतरित्या पोलादपूर उपअधिक्षक भुमिअभिलेख कार्यालयामार्फत जाहिर करण्यात आला असून यात भुमिअभिलेख उपअधिक्षक कार्यालयाचे कर्मचारी आणि चुना मागिची तारिख अशी माहिती देण्यात आली आहे.

पोलादपूर तालुक्यातील संबंधित तारखेला संबंधित गावांतील ग्रामस्थांनी या ड्रोनद्वारे सर्वेक्षणप्रसंगी उपस्थित राहून काही चुकीचे चालले नसल्याची खात्री करून चुकीचे सर्वेक्षण होत असल्यास तातडीने हरकत घेण्याची गरज असून कोणी तोंडी माहिती देत असल्यास ती खोटी अथवा चुकीची असल्यास तशा पध्दतीने लेखी हरकत घेऊन सुधारणा करण्यास भाग न पाडल्यास पोलादपूर उपअधिक्षक भुमिअभिलेख कार्यालयातील या अचानक होणाऱ्या बदलांवर जिल्हा भुमिअभिलेख अधिक्षक यांच्या न्यायालयात दाद मागावी लागून सातबारा उतारा असलेल्या मालकाला मोठ्या प्रमाणात आर्थिक भुर्दंड व मनस्तापाला सामोरे जावे लागत असल्याने या सर्वेक्षणावर सर्वांनीच बारकाईने लक्ष ठेऊन काटेकोरपणे ड्रोनद्वारे गावठाण जमिनींचे सर्वेक्षण करण्यात येत असल्याची खात्री करण्याची गरज आहे.

# अन्नदानाने पत्रकार विठ्ठल ममताबादे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । उरण**

पत्रकार, पोलिसमित्र, सामाजिक कार्यकर्ते, लेखक म्हणून संपूर्ण रायगड जिल्ह्यात सुपरिचित असलेले पत्रकार विठ्ठल ममताबादे यांचा वाढदिवस दिनांक १७/५/२०२२ रोजी उरण चारफाटा येथे झोपडपट्टीतील लहान मुलांना अन्नदान करून मोठ्या उत्सा–हात साजरा करण्यात आला. वाढदिवसा निमित्त अन्नदान करून पत्रकार विठ्ठल ममताबादे यांनी आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे. दरवर्षी विविध सामाजिक उपक्रमांनी पत्रकार विठ्ठल ममताबादे यांचा वाढदिवस साजरा केला जातो. यंदा वाढदिवस अन्नदान करून साजरा करण्यात आला.



सुफल आहार या संस्थेच्या माध्यमातून दररोज चारफाटा उरण येथील मुलांना एकवेळचे दुपारचे पौष्टिक अन्न दिले जाते. समाजातील अनेक नागरिक, विविध सामाजिक संस्था येथे अन्नदान करीत असतात. पत्रकार विठ्ठल ममताबादे यांच्या माध्यमातून वाढदिवसा निमित्त एका दिवसाचे एकवेळचे दुपारचे जेवण लहान मुलांना देण्यात आले. यावेळी श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील, भाजपा ट्रान्सपोर्ट सेलचे रायगड जिल्हाध्यक्ष विकी पाटील, उत्कृष्ट समलोचक सुनिल वर्तक, सदस्य –अभय पाटील,सादिक शेख, सागर घरत,गणेश ठाकूर, सुफल आहाराचे विकास शर्मा, स्मिता नाखवा आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.अनेक नागरिकांनी, विविध सामाजिक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी, सर्व राजकीय पक्षाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष भेटून तर काही जणांनी सोशल मीडियाद्वारे पत्रकार विठ्ठल ममताबादे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

# योगाशिक्षिका पौर्णिमा चांदवले यांचा सत्कार

**दै.रायगड नगरी । माथेरान**

सलग आठ दिवस माथेरान करांसाठी मोफत योग प्रशिक्षण देणाऱ्या पुण्याच्या पौर्णिमा चांदवले यांचा सत्कार सामाजिक कार्यकर्त्या वर्षा शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी जेष्ठ नागरिक ज्ञानेश्वर बागडे, सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, बाबू बर्गे, हर्ष शिंदे, अरिफा शेख, अर्चना कदम, यांसह अन्य योग प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. तर शालेय विद्यार्थ्यांनी सुध्दा या प्रशिक्षणात मोठया संख्येने हजेरी लावली होती.

याप्रसंगी सुनील शिंदेंनी सांगितले की, मूळच्या माथेरानच्या रहिवासी असलेल्या पौर्णिमा चांदवले (हेंद्रे) पुण्यात स्थायिक असून योगाभ्यास घेत असतात. त्यांनी उत्तम प्रकारे योग प्रशिक्षणार्थींना योगासने, प्राणायाम, ध्यान, ओंकार साधना, एरंबिक हे योगप्रकार शिकवले. शरीरासाठी योगाभ्यास किती महत्त्वाचे आहेत याचे परिपूर्ण ज्ञान पौर्णिमा चांदवले (हेंद्रे) यांनी आपला अमूल्य वेळ खर्च करून सलग आठ दिवस मोफत दिले आहे. पौर्णिमा यांची शिकविण्याची पद्धत खूपच चांगली असून आम्हाला यातून खूप काही शिकायला मिळाले आहे असे ज्ञानेश्वर बागडे यांनी स्पष्ट केले. आम्ही



नक्कीच यापुढेही योगप्रशिक्षण सुरू ठेऊन ज्यांना शारीरिक दृष्टीने सक्षम होण्याची इच्छाशक्ती आहे त्यांनाही सामावून घेऊ असे वर्षा शिंदे यांनी नमूद करीत भाग्यश्री बॅग शोरूमचे मालक हेमंत पवार यांनी पौर्णिमा चांदवले (हेंद्रे) यांना सत्कार समारंभ कामी दिलेल्या बॅग वर्षा शिंदेंच्या हस्ते देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

# डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानमार्फत आयोजित शिबीरात १ हजार १७७ जणांचे रक्तदान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानमार्फत रेवदंडा यांच्या वतीने पदमश्री डॉ. श्री दत्तात्रेय नारायण तथा अप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या वाढदिवसानिमित्त तीर्थरूप डॉ. सचिन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल येथील विरुपाक्ष सभागृहामध्ये सोमवारी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी ११७७ रक्तदात्यांनी रक्तदान केले.



डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानमार्फत घेण्यात आलेल्या रक्तदान शिबीर कार्यक्रमामध्ये श्रीसदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. आज सर्वत्र रक्ताची गरज भासत आहे अनेकांनी रक्त न मिळाल्याने आपले प्राण गमावले आहे. त्यामुळे रक्ताची भासत असलेली गरज दूर करण्यासाठी पद्मश्री आप्प–ासाहेब धर्माधिकारी यांच्या वाढदिवसानिमित्ताने डॉ. श्री. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्यामार्फत रक्तदान शिबिर राबविण्यात आले. शिबिरामध्ये रक्तदान करण्यासाठी दास भक्तांनी सकाळ पासूनच शिस्तबद्ध पद्धतीने आपला सहभाग घेतला होता. या अगोदरही प्रतिष्ठानमार्फत भव्य रक्तदान शिबिर, आरोग्य शिबीर, स्वच्छता मोहीम, वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन मोहीम राबविण्यात आली आहे. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार बाळाराम पाटील, महापौर डॉ. कविता चौतमोल, आयुक्त गणेश देशमुख, उपमहापौर सीता पाटील, जेष्ठ नेते बाळासाहेब पाटील, शिवसेनेचे संपर्कप्रमुख बबन पाटील, नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, नगरसेवक राजू सोनी, सभापती ॲड. वृषाली वाघमारे, नगरसेविका रूचिता लोंढे, डॉ. ययाती गांधी, त्याचबरोबर डी. वाय. पाटील, एम. जी. एम., तेरणा हॉस्पिटल डॉक्टर व त्यांचे सहकारी श्री सदस्य यावेळी उपस्थित होते.

# इसमाचा आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका इसमाचा मृतदेह खांदेश्वर रेल्वे स्टेशनच्या पटरीवर आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

तालुक्यातील हरिग्राम येथे राहणाऱ्या अंकुश मढवी या इसमाचा मृतदेह खांदेश्वर रेल्वे स्टेशन पटरीवर आढळून आला आहे. ही घटना कशामुळे घडली याचा शोध पनवेल रेल्वे पोलीस करीत आहेत.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमीन मिळकत आमचे अशिल यांनी विकत घेण्यासाठी मिळकतीचे विद्यमान मालक **श्री.यशवंत साटम व सौ.नेहा यशवंत साटम** यांच्याकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरोसा मिळकतीचे मालकांनी आमच्या अशिलांस दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन** : तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका : सुधागड यांचे हद्दीतील मौजे : नेरे, तालुका : सुधागड, जिल्हा : रायगड येथील, शेतीचे स्थानिक नाव : **माळ,** जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः–

| अ.क्र. | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | ७१–१६ | ०.३९.०० | २३.०० | श्री.यशवंत साटम व सौ.नेहा यशवंत साटम |

**सदर नोटीसीची विषय असलेले एकूण क्षेत्र ०.७८.०० आकार ०.६१ पैकी खरेदी करावयाचे क्षेत्र ०.३९.००, आकार ०.२३.०० असे आहे.**

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, ताबा, मालकी, वहिवाट, बयाणा, साठेकरार, लीज, चार्ज, बोजा, पोटगी हक्क, विक्री, तारण, गहाण, जाण्या–येण्याचा व इतर हक्क असल्यास त्यांनी, हक्काचे पृष्ठ्यार्थ असणाऱ्या सर्व कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कराव्यात. वरील मुदतीत अशा प्रकारच्या कोणत्याही हरकती न आल्यास, वरील मिळकतीमध्ये कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध नाही अथवा असल्यास तो आमच्या अशिलाचे लाभात सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीबाबत खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कोणाचीही येणारी हरकत, तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

स्थळ : सुधागड
तारीख : १७/०५/२०२२

**सही/–**
**ॲड.किरण डी. सावंत**
**कार्यालय पत्ता : ४१, पहिला मजला, हिरानंदानी क्रिस्टल प्लाझा, ३ स्टार हॉटेल जवळ, प्लॉट नं.१८–२७, सेक्टर–७, खारघर, नवी मुंबई–४१०२१०**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमीन मिळकत आमचे अशिल यांनी विकत घेण्यासाठी मिळकतीचे विद्यमान मालक **सौ.लक्ष्मी श्रावण जाधव, श्री.शांताराम श्रावण जाधव, सौ.वनिता शंकर वाघमारे** यांच्याकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरोसा मिळकतीचे मालकांनी आमच्या अशिलांस दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन** : तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका : सुधागड यांचे हद्दीतील मौजे : नेरे, तालुका : सुधागड, जिल्हा : रायगड येथील, शेतीचे स्थानिक नाव : **माळ,** जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः–

| अ.क्र. | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | ७७–२ ब | ०.३४.१० | ५.६९.०० | सौ.लक्ष्मी श्रावण जाधव<br>श्री.शांताराम श्रावण जाधव<br>सौ.वनिता शंकर वाघमारे |

**सदर नोटीसीची विषय असलेले खरेदी करावयाचे एकूण क्षेत्र ०.३४.१० आकार ५.६९.०० असे आहे.**

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, ताबा, मालकी, वहिवाट, बयाणा, साठेकरार, लीज, चार्ज, बोजा, पोटगी हक्क, विक्री, तारण, गहाण, जाण्या–येण्याचा व इतर हक्क असल्यास त्यांनी, हक्काचे पृष्ठ्यार्थ असणाऱ्या सर्व कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कराव्यात. वरील मुदतीत अशा प्रकारच्या कोणत्याही हरकती न आल्यास, वरील मिळकतीमध्ये कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध नाही अथवा असल्यास तो आमच्या अशिलाचे लाभात सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीबाबत खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कोणाचीही येणारी हरकत, तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

स्थळ : सुधागड
तारीख : १७/०५/२०२२

**सही/–**
**ॲड.किरण डी. सावंत**
**कार्यालय पत्ता : ४१, पहिला मजला, हिरानंदानी क्रिस्टल प्लाझा, ३ स्टार हॉटेल जवळ, प्लॉट नं.१८–२७, सेक्टर–७, खारघर, नवी मुंबई–४१०२१०**

मा.मुजावर साहेब
ॲड.सौ.अस्मिता एन. भुवड

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायालय यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.७४०/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२२/०७/२०२२

१) विकास तानाजी पवार
वय वर्षे २४, व्यवसाय :
रा.अं.भू.क्र.३९५/३९७, नवनाथ मंदिरासमोर, तात्पुरता निवास घरापैकी घर क्र.२५, पनवेल, जिल्हा : रायगड — अर्जदार

विरुद्ध

१) वत्सला तानाजी पवार
२) सौ.रेखा दिपक पवार
३) सौ.जयश्री गोरख शिंदे
४) कु.राजेश्री तानाजी पवार — सामनेवाला क्र.१ ते ४

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, कै.तानाजी रामा पवार हे दि.२३/०२/२०१६ रोजी शिवाजी नगर झोपडपट्टी, पनवेल, जिल्हा : रायगड येथे मृत्यू पावले. अर्जदार विकास तानाजी पवार हे कै. तानाजी रामा पवार ह्यांचा मुलगा आहे. सामनेवाला क्र.१ वत्सला तानाजी पवार ह्या कै.तानाजी रामा पवार ह्यांच्या पत्नी आहेत. सामनेवाला क्र.२ सौ. रेखा दिपक पवार ह्या कै.तानाजी रामा पवार ह्यांच्या विवाहित मुलगी आहे. सामनेवाला क्र.३ सौ.जयश्री गोरख शिंदे ह्या कै.तानाजी रामा पवार ह्यांच्या विवाहित मुलगी आहे. सामनेवाला क्र.४ कु.राजेश्री तानाजी पवार ह्या कै. तानाजी रामा पवार ह्यांची अविवाहित मुलगी आहे. सामनेवाला ह्यांनी अर्जदार ह्यांच्या नावे झोपडी होण्यास ना हरकत दाखविल्यामुळे त्यांना सामनेवाला केले आहे. कै.तानाजी रामा पवार ह्यांच्या नावे ताबा पावती कब्जातील झोपडीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**झोपडी मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे**

**झोपडीचे वर्णन**
**पनवेल महानगरपालिकेकडून अं.भू.क्र.३९५/३९७ (नवनाथ मंदिरासमोर) मध्ये बांधण्यात आलेल्या तात्पुरता निवारा घरापैकी घर क्र.५ पनवेल, जि.रायगड**

अर्जदार यांनी सदरील दिवाणी चौकशी अर्ज कै.तानाजी रामा पवार ह्यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून मिळणेकरिता दाखल केला आहे. सदर बाबत कोणालाही हरकत असेल अथवा त्या संदर्भात जर कोणतीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या मे.न्यायलयात व्यक्तीशः अथवा वकीलांसोबत हजर होवून हरकती कळवाव्यात.

या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत योग्य हरकती न घेतल्यास अर्जदार यांच्या लाभांत वारस दाखला प्रदान करण्यात येईल.

ही नोटीस आज रोजी दि.१७/०५/२०२२ रोजी माझ्या सहीने व शिक्क्याने दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.सोनावणे साहेब
प्रो.जमा रु.५०/– अर्जदारतर्फे वकील ॲड.मनोज म्हात्रे
ॲड.ज्योती सरोदे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.३८२/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०६/०६/२०२२

१) श्रीमती.गीता इंदर पांडे
वय : ५८ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.गौरव इंदर पांडे
वय : ३५ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्रीमती.नंदा धर्मानंद पांडे
वय : ८५ वर्षे, धंदा : गृहिणी
अर्जदार १ ते ३ रा.फ्लॅट नं.सी २/३२,
ज्ञानेश्वर नगर, को.ऑप.हौसिंग सोसायटी,
किडवाई रोड, शिवडी–वडाळा, मुंबई, महाराष्ट्र–४०००३१ — अर्जदार

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

२) अर्जदार क्र.१ हिचे पती आणि अर्जदार क्र.२ यांचे वडील आणि अर्जदार क्र.३ यांचा मुलगा आहे. कै.इंदर ध्वज धर्मानंद पांडे यांचा मृत्यू दि.१४/०७/२०२१ रोजी एमपीसीटी हॉस्पिटल, सेक्टर नं.४, सानपाडा, नवी मुंबई येथे झालेला असून कै.इंदर ध्वज धर्मानंद पांडे हे हयात असताना त्यांच्या मृत्यूपूर्वी त्यांचे मालकी हक्कात स्वसंपादीत गाव : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णन केलेली निवासी सदनिका ही मिळकत आहे.

नोंदणी क्र.पवल–३, २२०८/२०१५ दि.१७/०४/२०१५ रोजीच्या नोंदणीकृत दस्तामध्ये AGREEMENT FOR SALE मध्ये नमूद इंग्रजीमध्ये वर्णन खालीलप्रमाणे आहे.

GAMI TRIXIE CO.OP.HOUSING SOCIETY LTD., FLAT NO.401, 4 TH FLOOR, TOTAL OF FLAT AREA 44.645 QUE. MTR., "A" WING, PLOT NO.187, SECTOR-20, ULWE, TAL-PANVEL, DIST-RAIGAD, NAVI MUMBAI. (MAHARASHTRA)

वरील वर्णनाच्या कै.इंदर ध्वज धर्मानंद पांडे हे हयात असताना त्यांच्या मृत्यू अगोदर त्यांचे मालकी हक्कात सिडकोने विकसित केलेल्या गाव उलवे येथील वसाहतीच्या हद्दीत ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनाची निवासी सदनिका आहे. कै.इंदर ध्वज धर्मानंद पांडे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार क्र.१ यांची पत्नी म्हणून, अर्जदार क्र.२, ३ व ४ यांची मुले आहे हे सर्व कै. इंदर ध्वज धर्मानंद पांडे यांच्या हिश्याकरिता यांचे कायदेशीर वारसदार आहेत.

वरील निवासी सदनिके संदर्भात अर्जदार यांना वारस दाखला मिळणेकरिता या मे.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांना वारस दाखला देण्याबाबत कुणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात योग्य त्या कागदपत्रकासह सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांकडून कायदेशीर साक्षी पुरावे नोंदवून अर्जदार यांना वारस दाखला प्रदान करण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दि.११/०४/२०२२ रोजी कोर्टाच्या सहीशिक्क्याने दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**

मे.गोडसे मॅडम कोर्ट
ॲड.राजेश तु. बांगर
अर्जदार तर्फे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.८०९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१८/०६/२०२२

१) श्रीमती.सुरेखा अनंत भोईर
वय : ५३ वर्षे, धंदा : घरकाम
२) श्री.सुशिल अनंता भोईर
वय : २८ वर्षे, धंदा : नोकरी
३) सौ.चेतना प्रसाद हरे
वय : २६ वर्षे, धंदा : घरकाम
तिघेही रा.मु.पो.पडघे, ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.मृणाली गुरुनाथ भोपी
वय : ३२ वर्षे, धंदा : घरकाम
रा.घर नं.२२३, शंकर चांगा चौक,
सेक्टर २०, नेरुळ, नवी मुंबई, ठाणे
५) सौ.शितल अलंकार ठाकूर
वय : ३० वर्षे, धंदा : घरकाम
रा.नेवाली, पो.आदई, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्रं.१ यांचे मयत पती व अर्जदार क्रं.२ ते ५ यांचे मयत वडील कै.अनंता दुनकूर भोईर यांच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**अ) मौजे : पडघे, ता.पनवेल येथील शेतजमीन मिळकतीचे वर्णन :–**

| सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ४/४/१/अ | ०–२५–५०<br>पो.ख. ०–०२–३० | ४.०६ |

**ब) मौजे : पडघे, ता.पनवेल येथील घर मिळकतीचा असेसमेंट उतारा वर्णन :–**

| घर नं. | क्षेत्र चौ.फू./चौ.मी. |
|---|---|
| ४४७ | इतर पक्के घर ४२३.२०<br>अर्धे पक्के घर ५४.००<br>अर्धे पक्के घर इतर मजले ४२३.२० |

**क) मौजे : वळवली, ता.पनवेल येथील संपादीत शेतजमीन मिळकतीचे वर्णन :–**

| सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | युनिट केस नं. |
|---|---|---|
| २९/१ | ०–९५–४ | ४.०६ |

कै.अनंता दुनकूर भोईर हे दि.०७/०१/२०२२ रोजी हिरानंदानी फोर्टीस हॉस्पिटल वाशी नवी मुंबई येथे निधन झाले असून त्यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हेच वारस असल्याचे प्रतिपादन करून तसा वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास अशा हरकतदाराने/नी/आपली/ल्या लेखी हरकत/ती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी स्वतः अगर प्रतिनिधींमार्फत सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याचे आत सदर मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांचे विनंतीनुसार त्यांस वारस दाखला दिला जाईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

आज तारीख १७/०५/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## पंधरा वर्षीय मुलाचे अपहरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उसर्ली खुर्द येथील राहत्या घराच्या इमारतीच्या खाली खेळण्यासाठी गेलेला असताना पंधरा वर्षीय मुलाचे अज्ञाताने अपहरण केल्याचा गुन्हा पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. फैजान मोहम्मद जहीर मंसूरी असे अपहरण झालेल्या मुलाचे नाव आहे. त्याची उंची १६६ सेमी, बांधा सडपातळ, चेहरा गोल, वर्ण गोरा, केस काळे आहेत. त्याने अंगात राखाडी रंगाची जीन्स व मरून रंगाचा फुल बाह्यांचा शर्ट परिधान केलेला आहे. या मुलाबाबत अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत शेंडगे यांच्याशी संपर्क साधावा.

## विवाहिता बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक विवाहिता कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सौ. संजीवनी भारत कांबळे (३२) रा.करंजाडे, रंग सावळा, उंची ५ फुट, बांधा सडपातळ, चेहरा गोल, नाक सरळ असून कानात पिवळ्या धातूच्या रिंगा, पायात जोडवे व पैंजण तसेच रंगीबेरंगी साडी परिधान केलेली आहे. तिला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२३३३ किंवा पो.हवा.यशवंत भोसले यांच्याशी संपर्क साधावा.

## छावा संघटनेकडून बालग्राममधील लहान मुलांबरोबर छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बालग्राम खांदा कॉलनी, सेक्टर १२ पनवेल, येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त कार्यक्रमाच्या आयोजन करण्यात आले होते. स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेला अभिवादन करून अखिल भारतीय छावा संघटनेचे अध्यक्ष प्रसाद परब यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले. संभाजी महाराज महापराक्रमी योद्धा होते, त्याचबरोबर ते साहित्यिकही होते त्यांनी वयाच्या १४ व्या वर्षी संस्कृत मध्ये ग्रंथ लिहिले.

बुधभूषण, सातसतक, नखशिखा, नायिकाभेद सारख्या उत्तम ग्रंथांची रचना करणारे संभाजी राजांच्या साहित्याचा प्रचार प्रसार करण्याचा संकल्प अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे. यावेळी अखिल भारतीय छावा संघटना रायगड जिल्हा अध्यक्ष प्रसाद परब, संबिधान प्रचारक प्रविण जठार आणि शशी नायर उपस्थित होते. तसेच बालग्रामचे विनायक पाटील उपस्थित होते


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# उमठे धरणावर अवलंबून असणाऱ्या ६५ गावांना होतोय दुषित व दुर्गंधीयुक्त पाणी पुरवठा

### नागरिकांच्या आरोग्य व जिवीताचा प्रश्न गंभीर ; शुद्ध व मुबलक पाणीपुरवठा करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

रायगड जिल्ह्यातील अनेक गावांना सध्या भीषण पाणी टंचाईचा सामना करावा लागतो आहे, काही ठिकाणी धरण उशाला आणि कोरड घशाला अशी परिस्तिती दिसून येत आहे. उमटे धरणातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे? उमटे धरण हे मागील सन २०१६-१७ पासून उमटे धरणाचा गाळ काढून धरणाच्या संरक्षण भिंतीची भगदाडे भरावीत यासाठी उमठे धरण क्षेत्रातील ग्रामस्थांनी शासनाला वारंवार विनंती अर्ज दिले. मात्र शासनाने नकारात्मकतेची भूमिका घेवून धरणाचा गाळ न काढता लोकांच्या भावनेची चेष्टाच केली आहे. असे संतप्त ग्रामस्थानी म्हटले. याठिकाणी शासनाच्या जलजीवन मिशनची ऐशी की तैशी झालीय.प्रत्येक नागरिकाला दैनंदिन शुद्ध व मुबलक पाणीपुरवठा करण्याचा शासन आदेश इथं धुळीत मिळालाय. आपल्या समस्या व ज्वलंत पाणी प्रश्नाबाबतीत जिल्हाधिकारी रायगड , मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद, आमदार महेंद्र दळवी, पालकमंत्री तटकरे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष आस्वाद पाटील, शेकाप नेत्या चित्रलेखा पाटील तसेच मुख्य कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग रायगड जिल्हा परिषद यांना देण्यात आल्या आहेत. मात्र आजही या धरणाच्या गाळ उपसा व शुद्ध पाणीपुरवठा प्रश्नावर संवेदनशिल ता दिसून येत नाही. मागणीची जलद पूर्तता करावी अन्यथा....इथल्या पाणी प्रश्नावर उग्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थानी दिलाय.

सध्या उमटे धरणाच्या पाण्यावर धरणालगतची ६५ गावे अवलंबून आहेत. उमटे धरण हे रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत येते. मात्र राजकीय व शासकीय उदासीनतेमुळे धरणात मागील ४० ते ४५ वर्षांपासून गाळ तसाच साचलेला आहे. उमटे धरणाच्या पाण्यावर अवलंबून असणार्या येथील तरूणाईने दिनांक १ मे २०१९ रोजी तीन वर्षापूर्वी महाराष्ट्र दिनी धरणाचा गाळ काढण्याच्या संदर्भात श्रमदान करून शासनाचा निषेधही नोंदविला होता. शासनाने गाळ काढण्याचे आश्वासन दिले होते. मात्र आजपावेतो शासनाने घेतलेले



निर्णय धुळखात पडत असून गाळ तसाच साचलेला आहे हे दुर्देव आहे. उमटे धरणाचा गाळ यावर्षी तरी आपण युद्धपातळीवर काढाल अशी अपेक्षा ग्रामस्त महिलानी व्यक्त केलीये. परंतू सद्य स्थितीत आपण उमटे धरणाच्या पाण्यावर अवलंबून असणार्या ६५ गावांना पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने कोणतीही ठोस भूमिका घेतली जात नाही.

धरणाच्या वरच्या मथळ्यावर मागील ४ ते ५ वर्षांपासूनची करंज, साग, उंबर, उक्षी तसेच इतर रानटी झाडांची झुडपे मोठ्या प्रमाणात आहेत. सदरची झाडे वादळामध्ये उन्मळुन पडल्यास धरणाच्या वरच्या मथळ्याचे खुप मोठे नुकसान होणार आहे. धरणाच्या बांधनी चे दगड निखळले आहेत. भविष्यात हा बंधारा अधिक खचला तर सभोवतालची १० ते १५ गावे पाण्याखाली बुडतील अशी भीती ग्रामस्थानी व्यक्त केली आहे. धरणाच्या दयनीय अवस्थेची जिल्हा प्रशासनाने पाहणी करुन तात्काळ कारवाई करावी. अशी मागणी जोर धरते आहे. असंख्य गावांची तहान भागविणारे परंतू भ्रष्टाचाराच्या गाळात रुतलेल उमटे धरण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. धरणाची साठवण क्षमता जरी मोठी असली तरी सध्या धरण गाळाने भरलंय, मुबलक आणि स्वच्छ पाणी पुरवठा करण्यात यावा,धरणाची डागडुजी तात्काळ करावी यासाठी उमटे धरण क्षेत्रातील असंख्य तरुण, महिला आणि जेष्ठ मंडळी हे रायगड जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाकड़े सातत्याने सन २०१६ ते २०१७ पासून मागणी करीत आहेत. मात्र अद्याप मागणी ची पूर्तता होत नसल्याने येथील ६४ गावाना अत्यंत अशुद्ध, दुर्गंधियुक्त व आरोग्याला हानिकारक असा पाणीपुरवठा होत आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या अधिकार क्षेत्रात येणारे उमटे धरण आणि त्यातून होणाऱ्या अपुऱ्या व अशुद्ध पाणी पुरवठा हा मुबलक प्रमाणात व्हावा तसेच धरणातील गाळ व धरणाच्या संरक्षण करणाऱ्या भिंतींची डागडुजी करून मुबलक प्रमाणात पाणी पुरवठा करावा या पाण्याच्या हक्कांसाठी धरणाच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या ग्रामस्थानी रायगड जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाच्या विरोधात उमठे धरणावर जावून घोषणाबाजी करीत संताप व्यक्त केला. यावेळी धरणावर आलेले ग्रामस्थ वाजंत्री यांनी प्रशासनाच्या अकार्यक्षम कारभाराचे वाभाडे काढले. कित्येक वर्षे उमठे धरणाचा गाळ उपसा होत नसल्याने गावांना दूषित, गढूळ पाणीपुरवठा होत आहे याचा निषेध नोंदविला. जलजीवन मिशन योजनांची ऐशी की तैशी झाली असून धरणातले पाणी हातात घेऊ शकत नाही, अशी स्थिती आहे तर ते पिणार कसे असा सवाल विचारत हे पाणी पुदिनाची चटणी वाटत असली तरी हिरवळ व गाळ असल्याचे रवीं: मधुकर वाजंत्री म्हणाले.

संतप्त झालेल्या महिलांनी सांगितले नळातून येणारे पाणी गाळयुक्त व दूषित आहे, जे पाणी पिऊन लहान मुले व वृद्ध तसेच आम्ही आजारी पडतोय. दवाखान्यातील उपचाराचा खर्च परवडत नाही, पाणी विकत घेण्याची वेळ आमच्यावर आली आहे, मात्र हाताला काम धंदा नाही मग पाणी विकत कसे घेणार? पाणी हे जीवन आहे , पाणी समस्येने वर्षानुवर्षे ग्रासले असून जगावे की मरावे हा प्रश्न आम्हाला सतावत आहे.प्रशासनाने व सरकारने आमचा पाणी प्रश्न सोडवावा, व आम्हाला शुद्ध व मुबलक पाणी उपलब्ध करून द्यावे.

## दादा मोरे यांच्या हस्ते रेवदंडा-सुतारआळी रस्त्याच्या कामाचा शुभारंभ



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

शासनाच्या ग्रामीण रस्ते विकास निधीतून अलिबाग तालुक्यातील रेवदंडा ग्रामपंचायत हद्दीतील रेवदंडा -सुतारआळी रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामाचा शुभारंभ ज्येष्ठ समाजसेवक तथा माजी उपसरपंच दादा मोरे यांच्या शुभ हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला.

यावेळी ग्रामपंचायत सरपंच मनीषा चुनेकर, सदस्य राजेंद्रकुमार वाडकर, संदीप खोत, संतोष मोरे, सदस्या सुवर्णा चेरकर, खलिल तांडेल, तसेच सुरेश खोत, किशोर मानकर, शरद वरसोलकर, मुजफ्फर मुकादम, बाळू नवखारकर, दिलिप सातनाईक, किशोर कोळसेकर, मधुकर गायकवाड, माजी सदस्य आनंद म्हात्रे, निलेश मुकादम, राजेंद्र पाटील, राकेश मुकादम, संदेश बेडेकर, दादा मुकादम, विश्वनाथ घरत, मिलिंद वाडकर यांसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## माथेरान मधील हेरीटेज ग्रंथालयाला पर्यटकांची पसंती

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मधील ब्रिटिशकाळीन करसनदास मूळजी ग्रंथालयाला येथे येणाऱ्या पर्यटकांपैकी अनेक वाचक पर्यटक इथे आवर्जून भेट देत असतात.

माथेरान हे जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ असून थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. दरवर्षी लाखो पर्यटक येथे येत असतात.मालाड मुंबई येथील प्रदीप पुरोहित हे पर्यटक दर महिन्याला जवळपास तीन ते चार वेळा माथेरान मध्ये येत असून न चुकता या वाचनालयात विविध वर्तमान पत्र त्याचप्रमाणे ठरावीक पुस्तकांचे वाचन करतात.

माथेरान मध्ये फीरण्यासाठी खूप असे पॉईंट्स आहेत. माथेरानचा शोध १८५० साली एका ब्रिटिश अधिकारी ठाण्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी ह्युज मॅलेट यांच्या मार्फत लावण्यात आला होता. त्यामुळे आजही माथेरान मध्ये अनेक ब्रिटिशकालीन वास्तू मोठ्या थाटात उभ्या आहेत. यापैकी एक म्हणजे १८९४ सालची ब्रिटिशांनी उभी केलेले करसनदास मूळजी ग्रंथालय आजही आपली १२५ वर्ष पूर्ण करत ऐटीत उभे आहे. येथील या वाचनायत जुन्या काळातील अमूल्य पुस्तकांचा ठेवा जतन करून ठेवण्यात आला आहे. यामुळेच माथेरानला येणारे अनेक पर्यटक या वाचनालयाला आवर्जून भेट देतात. येथील खूप अश्या जुन्या पुस्तकांचा अनमोल ठेवा त्यांना भुरळ घालत असतो. माथेरानला येणारे काही नवीन पर्यटक सुद्धा या वास्तूला भेट देत आपले मनोगत व्यक्त करताना दिसत आहेत.



गुजरात येथील पर्यटक देखील माथेरानला आले असता त्यांनी या ग्रंथालयाला भेट दिली. येथील अनेक जुन्या मराठी, हिंदी, इंग्रजी पुस्तकांची भरलेली कपाटे पाहून त्यांना त्यांच्या वाचनाचा मोह आवरला नाही. आणि १२५ वर्ष जुने वाचनालय आजही सुस्थितीत आहे ही खूप मोठी प्रशंसनीय बाब आहे असे ते म्हणाले. तसेच माथेरान नगर पालिकेच्या मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी देखील या पर्यटकांची भेट घेऊन त्यांचे मनोगत जाणून घेतले.

## बनोटी येथील समाज मंदिराचे कोबनाक यांचे हस्ते उदघाटन

**दै.रायगड नगरी । म्हसळा**



चिंचबादेवी प्रासादिक भजन मंडळ, बनोटी, तालुका म्हसळा येथे सामाजिक समाज मंदिराचे उदघाटन भाजपा चे नेते कृष्णा कोबनाक यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी या मंडळातील सर्व जेष्ठ पदाधिकारी यांचे यथोचित सन्मान करण्यात आले हे भजन अतिशय जूने असून या माध्यमातून अनेक महिला, पुरुष या मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या उत्साहाने सामील झाले होते यांना मार्गदर्शन करताना मंडळातील सर्व सदस्यांनी संघटीत व्हावे व या बदलत्या युगात सर्व तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे ते स्वीकारून नवीन पीढीला मार्गदर्शन करण्यासाठी या समाज मंदीराच्या इमारतीचा वापर करावा आणि भविष्यात स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती साठी पुढाकार घेतला पाहिजे कारण गावातील बहुतांश कुटुंब स्थलांतरित होत आहेत ते थांबविण्यासाठी काम करावे असे आवाहन उपस्थित समाज बांधवांना कृष्णा कोंबनाक यांनी केले.

या कार्यक्रमाला तालुका अध्यक्ष प्रकाश रायकर, सरचिटणीस सुनील शिंदे, महेश पाटील शहर अध्यक्ष संतोष पानसरे, उपाध्यक्ष भाजपा लहू तूरे, चिटणीस मनोहर जाधव, दिलीप कोबनाक, गोविंद भायदे, महिला मोर्चा अध्यक्षा सौ. सुनंदा पाटील उपस्थित होत्या. ग्रामपंचायमंडळ ग्रामीण अध्यक्ष हरिश्चंद्र कांबळे, मुंबई मंडळ अध्यक्ष रघुनाथ भायदे, काशिनाथ कांबळे यांनी सर्व कार्यक्रमाचे आयोजन केले व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

# सरसगडावरील प्लास्टिक कचरा हद्दपार

### देऊळवाडा येथील प्रदीप व स्वाती गोळे दाम्पत्याचा विधायक उपक्रम

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पालीतील सरसगड किल्ल्यावर विविध ठिकाणी पडलेल्या प्लास्टिक बॉटल व प्लास्टिक कचरा हटविण्यात आला आहे. येथील देऊळवाड्यातील प्रदीप व स्वाती गोळे या दाम्पत्याने नुकतेच सरसगड स्वच्छता मोहीम राबवून किल्ल्याचा बराचसा भाग प्लॅस्टिकमुक्त केला आहे.

प्रदीप व स्वाती गोळे दाम्पत्य तसेच येथील अभिजित वरंडे हा तरुण गडाच्या पायथ्याशी लावलेली झाडे जगविण्यासाठी नियमित या झाडांना पाणी देखील घालतात. गडावर नेहमी पर्यटक व दुर्गप्रेमी येत राहतात. यातील काहीजण आपल्याकडील पाण्याच्या बॉटल, वेफर्स व इतर खाद्य पदार्थांचे वेस्टन गडावर टाकून जातात. हा प्लास्टिक कचरा साठल्याने गडावरील परिसर अस्वच्छ होऊन गडाची शोभा जात होती. त्यामुळे गोळे दाम्पत्यांनी ही मोहीम राबवली. यावेळी प्लास्टिकच्या बाटल्या व खाऊची वेस्टने आणि इतर कचरा जमा करून त्यांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यात आली.



पाली हे गाव सरसगडाच्या पायथ्याशी वसले आहे. जणु काही अनादी काळापासुन सरसगड या पल्लीपुराचे रक्षणच करत आहे की काय असे वाटते. अग्निजन्य खडकापासुन बनलेल्या या किल्याची उंची समुद्र सपाटी पासुन ४९० मिटर आहे. शिवाजी महराजांनी २००० होन खर्चुन दुरुस्त करुन घेतला होता. याच्यावर शंकराचे मंदिर, त्या बाजूला तळे, शहापिर दर्गा, कोठार, पाण्याचे टाके (हौद), तटबंदी पहावयास मिळते. किल्याच्या दक्षिण बाजुकडील १११ पायर्या सलग एकाच दगडात घडविलेल्या असुन उंच व प्रशस्त आहेत.

पावसाळ्यात ढगांमुळे किल्ला जणु ढगांच्या कुशीत लपलाय असे वाटते. पालीतुन किल्यावर पोहचायला साधारण एक तास लागतो.


## PANVEL MUNICIPAL CORPORATION
### TENDER NOTICE

No :- PMC/CE/PMAY/19/2022-23

CITY ENGINEER'S OFFICE (PMAY DEPARTMENT)

**INVITATION OF TENDER FOR THE WORKS OF "CONSTRUCTION OF HOUSING COMPLEX UNDER PRADHANMANTRI AAWAS YOJANA" (PMAY)**

Offers by way of e-tendering (Lump Sum Turn-key Form) are invited by the Commissioner, Panvel Municipal Corporation from contractors in e-tendering system for following works. Contractor shall quote his offer considering all taxes excluding GST.

| Name of work | Estimated cost put to the Tender (Rs) | Amount of E.M.D (Rs) | Time limit in Calendar months | Cost of Tender Document (Rs.) |
|---|---|---|---|---|
| Survey, Planning, designing, building construction, obtaining all relevant premissions, required completion / occupancy certificate from concerned authority on EPC (Lump-sum) for Construction of affordable housing under Pradhan Mantri Awas Yojana (Urban) for Rehab and Free sale dwelling units EVS-1500 & commercial component of 64 shops at Patel Mohalla & Kachhi Mohalla within Panvel Municipal Corporation area. | 221.62 Crores | 111.00 Lakhs | 36 Months (Including Monsoon) | Rs.5,000/- + 18% GST Total Rs.5900/- |

The details of above works, such as Security Deposit, Earnest Money Deposit, Terms & Conditions of the Tender and Schedule of works, are available on website www.mahatenders.gov.in Tenders for these works are to be submitted by e-tendering system.

**Bidders can avail the e-tender document from 20/05/2022 to 08/07/2022 up to 5.00 PM.**

Bidders should submit their offer by way of e-tendering system only. The last date of Submission by way of e-tendering will be **08/07/2022 up to 5.00 PM.** Commissioner, Panvel Municipal Corporation reserves the right to accept or reject any or all tender without giving any reason thereof.

**Sd/-**
**(Trupti Sandbhor)**
**Additional Commissioner**
**Panvel Municipal Corporation,**
**Panvel - 410206**